**ठळक बातम्या**

- राज्यात परकीय गुंतवणुकीतून उभ्या राहात असलेल्या उद्योगांची संख्या वाढत असून, ७५ टक्के करार हे प्रत्यक्षात उतरत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीत काल सुमारे ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के मतदान, उद्याच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मलेशिया दौऱ्यात उभय देशांमधे संरक्षण, सेमीकंडक्टर्स, आणि व्यापार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात ११ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या

- 'विकसित भारत बँकिंग' संदर्भात, एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार

**आणि**

- आयसीसी क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडचा अफगाणिस्तानवर ५ गडी राखून विजय

**<><><><><>**

राज्यात परकीय गुंतवणुकीतून उभ्या राहात असलेल्या उद्योगांची संख्या वाढत असून, ७५ टक्के करार हे प्रत्यक्षात उतरत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज अहिल्यानगरमध्ये एका ॲल्युमिनियम कास्टिंग कंपनीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. गेल्या वर्षी दावोस येथे झालेल्या गुंतवणूक करारांमधून उत्तर महाराष्ट्रातल्या ५ जिल्ह्यांमध्ये रोजगाराच्या ७५ हजार संधी उपलब्ध झाल्या असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. या करारांच्या माध्यमातून होणार असलेल्या ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकी पैकी एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

उद्योग मंत्री उदय सामंत, अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कंपनीचे कार्यकारी संचालक भरत गीते यांच्यासह मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत ताज पॅलेस हॉटेल इथे सेशेल्सचे अध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांची भेट घेतली आणि विविध विषयांवर चर्चा केली. किनारपट्टी व्यवस्थापन, बंदरांवर केंद्रित विकास तसंच, महाराष्ट्र आणि सेशेल्समध्ये सहकार्य वाढीच्या संधी यांवर या भेटीदरम्यान चर्चा झाल्याचं फडणवीस यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. या दरम्यान, फडणवीस यांनी हर्मिनी आणि सेशेल्सच्या नागरिकांना त्यांच्या ५०व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छाही दिल्या. या बैठकीला सेशेल्सचे परराष्ट्र मंत्री बॅरी फोर, अर्थमंत्री पिअरे लापोर्टे यांच्यासह मंत्री तसंच राज्यातले वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

गेले सलग तीन महिने भारताच्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेत असलेल्या परकीय गुंतवणुकदारांनी, फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्याच आठवड्यात पुन्हा एकदा ८ हजार १२९ कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक केली आहे. अमेरिका आणि भारतात झालेला व्यापारी करार आणि अर्थसंकल्पातल्या सकारात्मक तरतुदींमुळे परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा वाढला असल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काल शांततेत मतदान झालं. या निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या ७ हजार ४३८ इतक्या उमेदवारांचं भवितव्य काल मतदान यंत्रांमध्ये बंद झालं. आता उद्या सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होणार आहे. मतमोजणीसाठी राज्य निवडणूक आयोगानं सुरक्षेसह सर्व व्यवस्था केली आहे.

या निवडणुकीसाठी काल एकूण ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के झालं. सर्वाधिक ७४ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदान परभणी इथं तर रत्नागिरीत सर्वात कमी ५५ पूर्णांक ७९ शतांश टक्के इतकं मतदान झालं.

**<><><><><>**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची टक्केवारी आमच्या वार्ताहरांनी कळवली आहे. **सांगली** जिल्ह्यात ६९ पूर्णांक ७६ शतांश टक्के इतके मतदान झालं.

**कोल्हापूर** जिल्ह्यात ७४ पूर्णांक ३५ शतांश टक्के

**रायगड** जिल्ह्यात ६९ पूर्णांक ९१शतांश टक्के
सिंधुदुर्ग जिल्ह्यात ६१ पूर्णांक ९८ शतांश टक्के
पुणे जिल्ह्यात ६८ पूर्णांक ३५ शतांश टक्के
सातारा जिल्ह्यात ६७ पूर्णांक ८० शतांश टक्के
सोलापूर जिल्ह्यात ६५ पूर्णांक ९० शतांश टक्के
छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ७२ पूर्णांक ६९ शतांश टक्के
धाराशिव जिल्ह्यात– ६५ पूर्णांक २२ शतांश टक्के
लातूर जिल्ह्यात– ६३ पूर्णांक ७९ शतांश टक्के
मतदान झालं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मलेशिया दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी उभय देशांमधे संरक्षण, सेमीकंडक्टर्स, आणि व्यापार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार्याबाबत चर्चा झाली. मलेशियाबरोबर भारताचं विशेष नातं असल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याबरोबर संयुक्त निवेदनात व्यक्त केली. दहशतवादाविरोधात मित्र देशांना पूर्ण सहकार्य देण्याचं भारताचं धोरण असून त्याबाबत दुटप्पीपणा किंवा कोणतीही तडजोड होणार नाही असं मोदी यांनी स्पष्ट केलं.....

\- **- - होल्ड- बाईट- मोदी - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय तंत्रज्ञान, आरोग्य, आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रात परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याचा निर्धार दोन्ही पक्षांनी व्यक्त केला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेतले माजी सैनिक जयराज राजा राव क्वालालुंपूर इथं राहत असून त्यांची भेट प्रधानमंत्र्यांनी घेतली. भारताच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल राव यांनी मोदी यांचं अभिनंदन केलं.

या द्विपक्षीय चर्चेनंतर विविध क्षेत्रातल्या ११ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><><>**

विकसित भारताच्या वित्तपुरवठ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सक्षम असे मोठे वित्तपुरवठादार तयार करण्याच्या उद्देशानं, सरकार लवकरच ‘विकसित भारत बँकिंग’ संदर्भात, एक उच्च स्तरीय समिती स्थापन करणार आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री

निर्मला सीतारामन यांनी दिली. विकसित भारताला वित्त पुरवठा करण्यासाठी बँकिंग व्यवस्था कशी सक्षम करता येईल याच्या उपाययोजना ही समिती सुचवेल अशी अपेक्षा असल्याचं निर्मला सीतारामन यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.

**<><><><><>**

सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी एक प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने आणि भारतीय राष्ट्रीय कला आणि सांस्कृतिक वारसा विश्वस्त मंडळाबरोबर एक सामंजस्य करार केला आहे.

मराठवाड्याच्या भागात हजारो ऐतिहासिक कलाकृती, चित्र आणि प्राचीन हस्तलिखितं उपलब्ध आहेत, मात्र अशा दस्तऐवजांचं वैज्ञानिक पद्धतीनं जतन संरक्षण करण्यासाठी सुविधांच्या अभाव आहे.

**<><><><><>**

बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतात अवैध वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी नागरिकांना आज मुंबईतल्या कुरार गावातून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून बांगलादेशी नागरिकत्वाचे पुरावे जप्त करण्यात आले असून त्यांना मायदेशी परत पाठवण्याची कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

आयसीसी क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज तीन सामने खेळवले जात आहेत. चेन्नई इथं आजच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडने अफगाणिस्तानवर ५ गडी राखून विजय मिळवला. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत विजयासाठी १८३ धावाचं आव्हान न्यूझीलंडला दिलं होतं. ते न्युझिलंड संघान ५ गड्यांच्या मोबदल्यात केवळ १७ षटकं ५ चेंडूत पूर्ण केलं.

विश्वचषकाचा दुसरा सामना ग्रुप सी मधील इंग्लंड आणि नेपाळ यांच्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सुरु झाला आहे. इंग्लडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

आर्यलंड आणि श्रीलंका यांच्यातला ग्रुप बी चा सामना कोलंबोच्या के आर प्रेमदासा स्टेडियमवर संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर काल अमेरिकेबरोबरचा सामना भारतानं २९ धावांनी जिंकला. भारताचा पुढचा सामना येत्या गुरुवारी १२ तारखेला नामिबियाबरोबर होईल.

<><><><><>

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं २०२५ च्या प्राप्तीकर कायद्याशी संबंधित प्राप्तीकर नियम आणि अर्जांबाबत संबंधितांकडून सूचना मागवल्या आहेत. राष्ट्रपतींनी गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये या कायद्यावर स्वाक्षरी केली होती. त्यानंतर आता येत्या १ एप्रिलपासून हा कायदा लागू होणार आहे.

//<><><><><>//